**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५२/२०१७-१८/ 37 दिनांक: ०५.०३.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ५२/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री गुरबूस लक्ष्मण बनहट्टी<br>मु.पो. बसरगी ता. जत जि. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

5/3/2018

१) प्रस्तुत प्रकरण तक्रारदाराने अतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली,यांच्या दि. १६.११.२०१७ च्या निकाला वरुन व्यथित होऊन दाखल केलेले आहे.

२) प्रकरणाची थोडक्यात हकिकत अशी कि तक्रारदार श्री गुरुबुस लक्ष्मण बनहटटी रा. बसरगी ता. जत जि. सांगली यांनी त्यांच्या शेत गट क्र. ११, मौजे बसरगी ,ता. जत जि. सांगली या शेतात ५ अश्वशक्तीची वीज जोडणी दि. १५.०९.२००७ रोजी ओ.आर.सी. (out right contribution) या योजनेतून घेतली असून त्यांचा ग्राहक क्र. २७०३८०४९५१०१ असा आहे. सदर वीज पुरवठा देणे कामी लागलेले इफ्रान्स्ट्रक्चर तक्रारदाराने स्वःखर्चाने उभे केलेले आहे. तो खर्च तक्रारदाराने , मा. महाराष्ट्र राज्य वीज नियमाक अयोगाच्या केस क्र. ७०/२००५ मधील दि. ०८.०९.२००६ च्या आदेशानुसार व्याजासह परत मिळणेबाबत तक्रारदाराने मागणी केली असता सदर मागणी मंजूर न झाल्याने तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे दि. १३.०९.२०१७ रोजी तक्रार क्रमांक २९ दाखल केली सदर तक्रारीची सुनावणी होऊन अतर्गत तक्रार निवारण कक्षाने , मु.अ. /वितरण यांचे परिपत्रक क्र.२५०७९ दि. १२.१०.२०१७ नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे आदेश पारित केले.

३) सदर आदेशास, तक्रारदाराने परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या मुद्यांवरुन आवाहन दिलेले असून त्यांच्या मागणी प्रमाणे ORC या योजनेचा ५ पोलसाठी रक्कम रु, ७८,००० /- , सदर नवीन वीज कनेक्शन जे इफ्रास्ट्रक्चर स्वःखर्चाने उभे केले आहे त्याचा अंदाजपत्रकीय खर्च सव्याज व रोखीने परत करावा. १.३ टक्के किंवा १५ टक्के असे भरलेले सुपरव्हीजन चार्जेस देखिल सव्याज परत मिळावेत अशी मागणी केलेली आहे.

४) सदर प्रकरणी , सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर दि. ०३.०३.२०१८ रोजी कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय, कवठेमहकाळ यांनी आपले म्हणणे या मंचासमोर दाखल करुन दि. १२.१०.२.२०१७ व दि. २९.१२.२०१७ च्या मु.अ /वितरण /डी-४/MERC/२५०७९ व ३१७९३अनु.क्र. या परिपत्रकानुसार तक्रारदार ग्राहकाने मुळ पावती व अर्ज सादर केल्यानंतर वीज बिलातून प्रतावा देण्याची कार्यवाही त्या कार्यालयाकडून करण्यात येत असून याप्रमाणे ग्राहकांच्या तक्रारीचे निरसन करण्यात येत असल्याचे निवेदन देण्यात केलेले आहे.

५) सदर प्रकरणाची सुनावणी आज रोजी मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी वेळी ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री हरिभाऊ खापरे तर विज वितरण कंपनी तर्फे काळबांदे उपकार्यकारी अभियंता उपविभाग जत, हे उपस्थित होते. सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी श्री खापरे यांनी वीज वितरण कंपनी तर्फे दि. ०३.०३.२०१८ रोजी दाखल करण्यात आलेल्या लेखी निवेदनावर आक्षेप घेत आपला लेखी युक्तिवाद या मंचासमोर सादर केला. त्यांच्या कथनानुसार सदर निवेदनात नमूद केलेल्या दि.१२.१०२०१७ व दि. २९.१२.२०१७ रोजीचे संदर्भाकित परिपत्रके ही मा.वीज नियमाक आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ मधील निकालाच्या सुसंगत नसल्याने ती मुलतःच बेकायदेशीर आहेत, आणि तक्रारदार ग्राहकांने मुळ पावती व अर्ज सादर केल्यानंतर वीज बिलातून परतावा देण्याची कार्यवाही सदर निकालास अभिप्रेत नसल्याने ती मागणी देखिल बेकायदेशीर आहे.तथापि आपल्या युक्तिवादा दरम्यान श्री खापरे यांनी सदरचा आक्षेप या मंचासमोर मागे घेतला आहे. उपकार्यकारी अभिंयता श्री संजय मर्धेश काळबांधे यांनी आपले युक्तिवादात वितरण कंपनी तर्फे या मंचासमोर दि. ०३.०३.२०१८ रोजी सादर करण्यात आलेल्या लेखी निवेदनातील भुमिका योग्य व कायदेशीर असल्याबाबत युक्तिवाद केला.

5/4/2018

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO.
महावितरण

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.



६) प्रस्तुत प्रकरणी ग्राहकातर्फे मा.अपिलेट ट्राब्युनल फॉर इलेकेट्रीसीटी अपिलेट ज्युरिसडीक्शन यांच्या अपिल क्र. २२/२००७ दि. १४.०५.२००७ तसेच मा. महाराष्ट्र वीज नियमाक आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ मधील दि. १७.०५.२००७ तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हील अपिल क्र. ४३०५/२००७ मधील दिनांक १०.११.२०१६ मधील निकालाच्या प्रती सादर करण्यात आलेल्या आहेत. या सर्व निकालाचा मतितार्थ ग्राहकांला वीज पुरवठा करण्याकरता आवश्यक असणा-या सर्व संचाची उभारणी करण्याचे काम वीज वितरण मंडळाचे असून केवळ डीडीएफ योजने खाली देण्यात आलेला वीज पुरवठा सोडून इतर सर्व वीज पुरवठा उभारणी करण्याकरता आलेला खर्च वीज वितरण कंपनीने करावयाचा असून असा खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यात आलेला असल्यास तो त्यास व्याजसह परत करावा, असा आहे. त्यानुसार वीज वितरण कंपनीने दि. १२.१०.२०१७ चे परिपत्रक क्र. २५०७९ आणि दि. २९.१२.२०१७ परिपत्रक क्र. ३१७९३ काढले असल्याचे दिसते. दि. १२.१०.२०१७ चे परिपत्रक क्र. २५०७९ अन्वये केवळ २० जानेवारी २००५ ते ३०.०४.२०१७ या कालावधीत वीज पुरवठा करण्यात आलेल्या ग्राहकाकडून वसूल करण्यात आलेले. एसएलसी (सव्हीस लाईन चार्जेस) , ओ.आर.सी. चार्जेस व मीटर कॉस्ट परत करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तर दि. २९.१२.२०१७ च्या परिपत्रक क्र. ३१७९३ अन्वये सदरचा कालावधी २० जानेवारी २००५ ते २०.०५.२००८ असा वाढाविण्यात आलेला आहे. तथापि परिपत्रक क्र. २५०७९ मधील इतर मजकूर अबाधित ठेवण्यात आलेला आहे. परिपत्रक क्र. २५०७९ मधील मुद्दा क्र. २ नुसार २० जानेवारी२००५ ते ३०.०४.२००७ या कालावधीत सर्व एल.टी. /एच.टी . नवीन विद्युत ग्राहकाकडून एस.एल.सी. आ.आर.सी आणि मीटर चार्जेस वसूल करण्यातआले असल्यास ते मुळ भरणा केल्याची पावती ग्राहकाने हजर केल्यास व्याजासह परत करावेत. असे नमूद केलेले आहे. परिच्छेद क्र.३ मध्ये मुळ पावती गाहळ झाली असल्यास ग्राहकाकडून योग्य त्या मुल्यांच्या स्टॅप पेपरवर हमी पत्र लिहून घेऊन परत करावे. अशा सुचना निर्गमित केलेल्या आहेत. परिच्छेद क्रमांक ५ नुसार एस.एल.सी., ओ.आर.सी., व मीटर चार्जेस च्या रक्कमा , ग्राहकाच्या खाती जमा टाकून त्यांचे त्यास क्रेडीट द्यावे आणि त्या रक्कमांचा परतावा करावा अशा सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

७) मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियमाक आयोगाने आपल्या केस क्र. ८२/२००७ मधील दि. १७.०५.२००७ च्या आदेशांत कोणतीही मुदत, मुख्यतवे करुन दि.२०.०५.२००५ ते ३०.०४.२००७ किंवा दि. २०.०१.२००५ ते दि. २०.०५.२००८ हा कालावधी नमूद न करता किंवा मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अपिल क्र. ४३०५/२००७ मधील दि. १०.०११.२०१६ रोजी पारित केलेल्या निकाली देखिल कोणताही कालावधी नमद केलेला नसता, वर नमूद केलेल्या परिपत्रकामध्ये सदरचा कालावधी कसा नमूद करण्यात आला याचे कोणतेही स्पष्टीकरण विद्युत वितरण कंपनीतर्फे देण्यात आलेले नाही. सबब, त्या मुदतीच्या हद्दीपर्यन्त सदरची परिपत्रके ही कायदेशीर नाहीत. असा या मंचा स्पष्ट निकर्ष आहे. तथापि जरी तक्रारदाराने आपल्या अपिलात सदर मुद्दा मांडलेला असला तरी अंतिम युक्तिवादा दरम्यान सदरचा मुद्दा सोडून दिला असल्या कारणाने त्याबाबत या आदेशात कोणताही ठाम निष्कर्ष काढण्याची आवश्यकता नाही. वस्तुतः आपल्या दि. ०३.०३.२०१८ च्या लेखी निवेदनांत विद्युत वितरण कंपनीने तक्रारदाराची मागणी मान्य केलेली आहे.

८) सबब प्रस्तुत अपिल मंजूर करावे लागेल असे या मंचाचा निकर्ष आहे. त्यानुसार आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदार विद्युत वितरण कंपनीने तक्रारदारांस त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेले एस.एल.सी. ओ.आर.सी. व मिटर कॉस्ट तक्रारदारास वीज पुरवठा केल्या तारखेपासून द.सा.द.शे. ६ टक्के दराने, या आदेशाच्या तारेखेपर्यन्त व्याजासह परत करावेत.

३) सदर प्ररतावा, तक्रारदारस सदर रक्कमेचे क्रेडीट देऊन वीज बिलातून करावा.

४) सदर आदेशांचे पालन केल्याचे या मंचासमोर या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांत निवेदन करावे. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

5/3/018 5/3/2018 5/3/2018

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KO... MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण